## दिनांक 25.6.1975 ते दिनांक 31.3.1977 या आणिबाणीच्या कालावधीत कारावास भोगलेल्या व्यक्तींना मानधन मिळणेबाबत करावयाचा अर्जचा नमुना

प्रति,

मा. जिल्हाधिकारी साहेब
जिल्हाधिकारी कार्यालय,
चंद्रपुर

कोर्ट फि
स्टँम्प रु 5/- मात्र

अर्जदाराचा
पती/पत्नी
यांचे
पासपोर्टसाईज
फोटो

संदर्भ :- 1. शासन निर्णय क्र.निवृवे-1015/प्र.क्र.261/2015(2018)/स्वा.सै.क.-1दिनांक-14/02/2018
2. शासन निर्णय क्र.निवृवे-1015/प्र.क्र.261/2015(2018)/स्वा.सै.क.-1दिनांक-03/07/2018

| अ.क्रं. | अर्जातील बाब | आणिबाणी कालावधीत कारावास भोगलेल्याबाबत अर्जदार यांनी सादर करावयाचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे नाव | |
| 2 | आणिबाणी कालावधीत कारावास भोगलेल्या व्यक्तींचे नाव | |
| 3 | मुळ रहिवासाचा पत्ता | |
| 4 | सद्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| 5 | आणिबाणी कालावधीत कारावास भोगलेला व्यक्ती हयात आहे किंवा मयत आहे ? | |
| 6 | आणिबाणी कालावधीत कारावास भोगलेला व्यक्ती मयत असल्यास, त्यांचे पती/पत्नीचे नाव व पत्ता | |
| 7 | कारावास भोगलेल्या कारागृहाचे नाव व ठिकाण (अटकेचे स्वरुप मिसा/इतर) | |
| 8 | कारावास भोगलेल्या कालावधी व एकुण महीने किंवा दिवस | दिनांक- / / ते दिनांक- / / <br> एकुण - महीने / दिवस |
| 9 | राष्ट्रीयकृत बँकेतील बँक खाते क्रमांक/बँकेचे नाव/शाखा व IFSC कोड | |
| 10 | अर्जदाराची जन्मतारीख | |
| 11 | आधारकार्ड क्रमांक | |
| 12 | संपर्कासाठी मोबाईल/दुरध्वनी क्रमांक | |
| 13 | महाराष्ट्र राज्यातील अधिवासी आहे का? (तहसिलदार यांचे कडील अधिवासी डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक आहे.) | |

मी उपरोक्त आणिबाणी कालावधीत करावास भोगलेला असल्याने मला/वारस पत्नीस शासकीय नियमानुसार मानधन मिळावे ही विनंती आहे.

दिनांक - / /2018

अर्जदाराचे संपुर्ण नाव व सही/डाव्या हाताच्या अंगठा निशाणी
( नाव ..........................................................................)

## परिशिष्ट "अ"

## शपथपत्राचा नमुना

मी श्री/श्रीमती .................................................................... वय......... वर्षे राहणार ..................याद्वारे प्रतिज्ञा करतो/करते की,

१. मी आणिबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना दि. .................. ते दि.................. या कालावधीत .................................................. या कारागृहात कारावास भोगलेला आहे.

२. सदर कारावास भोगल्याबद्दल मी आतापर्यंत शासनाकडून कोणतेही मानधन स्विकारलेले नाही. तसेच त्यानुषंगाने कोणताही लाभ मी स्विकारत नाही.

३. मी वर नमूद केलेली माहिती खरी आहे. तसेच अर्जासोबत सादर करीत असलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत.

जर मी वर दिलेली माहिती यानंतर खोटी किंवा चुकीची आहे, असे आढळून आले तर मला देण्यात आलेले अर्थसहाय्य शासन निश्चित करेल अशा दंडनीय व्याजदराने येणा-या व्याजासह शासनास परत करेन, आणि जर असे करण्यास मी चुकलो/चुकले तर ती रक्कम माझ्याकडून वसूल करण्यात यावी. खोटी व चुकीची माहिती सादर केल्याबद्दल आणि खोटी कागदपत्रे सादर केल्याबद्दल माझ्यावर फौजदारी खटला दाखल करण्यात येईल व फौजदारी न्यायालयाकडून बजावण्यात येणारी शिक्षा मला भोगावी लागेल, तसेच मला मिळणारे मानधन बंद करण्यात येईल. याची मला पूर्णत:जाणीव आहे.

ठिकाण: - अर्जदाराची स्वाक्षरी/ डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी

दिनांक:-

उक्त डाव्या अंगठ्याची निशाणी माझ्या समक्ष अर्जदाराने उमटवली आहे.

तहसिलदारचे नाव व स्वाक्षरी

**सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणा-या ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासंबंधी धोरण**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ३२
दिनांक - ०३ जुलै, २०१८.

संदर्भ: शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१,
दि. १४/०२/२०१८

**प्रस्तावना :**

भारतामध्ये दिनांक २५.६.१९७५ ते दिनांक ३१.३.१९७७ या कालावधीत आणिबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्याबाबतचा प्रस्ताव विभागातर्फे दिनांक २.१.२०१८ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये यावर मा.मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि "या विषयावरील धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती" नेमण्याचा निर्णय घेतला.

मा.मंत्रिमंडळ बैठकीतील सदर निर्णयानुसार या प्रकरणी संदर्भाधीन दि. १४/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री,महसुल यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे "मंत्रिमंडळ उपसमिती" गठीत करण्यात आली आहे.

१. अध्यक्ष- मा.मंत्री, महसुल
२. सदस्य- मा.मंत्री (कृषी)
३. सदस्य- मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा)
४. सदस्य-मा.राज्यमंत्री (गृह)
५. सदस्य- मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन)
६. सदस्य- अपर मुख्य सचिव (वित्त विभाग)
७. सदस्य- अपर मुख्य सचिव (गृह विभाग)
८. सदस्य -प्रधान सचिव व वि.चौ.अ.१ (सामान्य प्रशासन विभाग)
९. सदस्य सचिव- उप सचिव स्वातंत्र्य सैनिक कक्ष (सामान्य प्रशासन विभाग)

याप्रकरणी सदर समितीने शासनास केलेल्या शिफारशी विचारात घेऊन यासंबंधी धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

भारतामध्ये दिनांक २५.६.१९७५ ते दिनांक ३१.३.१९७७ या कालावधीत आणिबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत ज्या व्यक्तींना कारावास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करणेबाबत धोरण पुढीलप्रमाणे राहील:-

१) आणिबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या व्यक्तींना मसिक दहा हजार व त्यांच्या पश्च्यात त्यांच्या पत्नीस / पतीस पाच हजार रुपये मानधन देण्यात येईल. तर, एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना मासिक रुपये पाच हजार, तर त्यांच्या पश्च्यात त्यांच्या पत्नीस / पतीस रुपये अडीच हजार मानधन देण्यात येईल.

२) आणिबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे.अर्जासोबत सादर करावयाच्या शपथपत्राचा मसुदा सोबत परिशिष्ठ “अ” मध्ये जोडला आहे.

३) मिसा अंतर्गत अटक झालेल्या व्यक्तींना मानधन मंजूर करण्याचे अधिकार संबंधीत जिल्हाधिकारी यांना असतील. संबंधीत जिल्हाधिकारी यांच्याकडून मानधन मंजूर झालेल्या व्यक्तींची यादी शासनाकडे सादर करतील. सदर यादीनुसार शासन संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास निधी उपलब्ध करून देतील.

४) अर्जदार महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असणे आवश्यक आहे.

५) सदर धोरण दि. ०२ जानेवारी, २०१८ पासून लागू राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०७०४११५८३३७३०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सु. म. खाडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता विधान परिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. मा.सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन मुंबई,

६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
९. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १, मुंबई,
१०.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र २, नागपूर,
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व जिल्हाधिकारी,
१३.सर्व पोलीस आयुक्त,
१४.सर्व पोलीस अधीक्षक,
१५.सर्व तुरुंगाधिकारी,
१६.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१७.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९. सामान्य प्रशासन विभाग, का.२५, मंत्रालय, मुंबई,
२०.क.अ. वित्त विभाग, (अर्थ संकल्प १३ / व्यय-४) मंत्रालय, मुंबई,
२१.निवड नस्ती/स्वासैक-१.

## परिशिष्ट "अ"

## शपथपत्राचा नमुना

मी श्री/श्रीमती ................................................................. वय......... वर्षे राहणार ..................याद्वारे प्रतिज्ञा करतो/करते की,

१. मी आणिबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना दि. .................. ते दि.................. या कालावधीत .................................................. या कारागृहात कारावास भोगलेला आहे.
२. सदर कारावास भोगल्याबद्दल मी आतापर्यंत शासनाकडून कोणतेही मानधन स्विकारलेले नाही. तसेच त्यानुषंगाने कोणताही लाभ मी स्विकारत नाही.
३. मी वर नमूद केलेली माहिती खरी आहे. तसेच अर्जासोबत सादर करीत असलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत.

जर मी वर दिलेली माहिती यानंतर खोटी किंवा चुकीची आहे, असे आढळून आले तर मला देण्यात आलेले अर्थसहाय्य शासन निश्चित करेल अशा दंडनीय व्याजदराने येणा-या व्याजासह शासनास परत करेन, आणि जर असे करण्यास मी चुकलो/चुकले तर ती रक्कम माझ्याकडून वसूल करण्यात यावी. खोटी व चुकीची माहिती सादर केल्याबद्दल आणि खोटी कागदपत्रे सादर केल्याबद्दल माझ्यावर फौजदारी खटला दाखल करण्यात येईल व फौजदारी न्यायालयाकडून बजावण्यात येणारी शिक्षा मला भोगावी लागेल, तसेच मला मिळणारे मानधन बंद करण्यात येईल. याची मला पूर्णत:जाणीव आहे.

ठिकाण: - अर्जदाराची स्वाक्षरी/ डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी

दिनांक:-

उक्त डाव्या अंगठ्याची निशाणी माझ्या समक्ष अर्जदाराने उमटवली आहे.

तहसिलदारचे नाव व स्वाक्षरी